प्राण्यांपासून धागे —

# रेशीम

सखूची चोळी
रेशमी आहे.
चोळीचे कापड चमकदार,
मऊ आणि झुळझुळीत आहे.



सखूने बाबांना विचारले, "रेशमाचे झाड कसे असते ?"

बाबा म्हणाले, "कापसासारखे रेशमाचे झाड नसते. रेशीम एका जातीच्या किड्यापासून मिळते. हे किडे झाडाच्या पानांवर अंडी घालतात. अंडी पानाला चिकटून रहातात.

© होमी भाभा विज्ञान शिक्षण केन्द्र, मुंबई-४०० ००५.

प्रकाशक : इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन,
पुणे-४११०२९.

अंड्यातून अळी बाहेर पडते.
ही अळी पाने कुरतडून खाते.
खाऊन खाऊन जाडजूड होते.



अळी मोठी झाली की तिच्या तोंडातून एक बारीक धागा बाहेर येतो. हा धागा म्हणजेच रेशीम.



हा रेशमी धागा अळी आपल्या
अंगाभोवती गुंडाळून घेते.
धागा सुकला की अळीचे घर
तयार होते. अंड्यासारख्या
दिसणाऱ्या ह्या घराला
कोश म्हणतात.

कोशात असताना अळी काही खात नाही. कोशात तिचा आकार बदलतो. काही दिवसांनी अळीचे फुलपाखरू होते आणि कोश पोखरून बाहेर पडते.



फुलपाखराने कोश पोखरला की कोशाला भोक पडते. धागा तुटतो. सलग लांबलचक धागा मिळत नाही म्हणून फुलपाखरू बनायच्या आधी कोश उकळत्या पाण्यात टाकतात. त्यामुळे आतली अळी मरते. मग कोशाचे रेशीम हलकेच सोडवून घेतात.

ह्या लांब धाग्यांच्या लडी बनवतात. त्यांना वेगवेगळे रंग देतात. रंगीत रेशमी कापड विणतात.



रेशमाचे किडे तुतीच्या झाडांवर अंडी घालतात. रेशीम मिळवण्यासाठी तुतीच्या झाडांची मुद्दाम लागवड करतात. ह्या झाडांवर रेशमाचे किडे पाळतात.

कर्नाटक राज्यात म्हैसूरजवळ तुतीची लागवड केली आहे. तेथे रेशमाचे खूप उत्पादन होते.

भिंतीवरचा कोळीसुध्दा धागा तयार करतो. ह्या धाग्याचे जाळे विणतो. पण कोळ्याचा धागा नाजूक आणि चिकट असतो. त्याचे कापड विणता येत नाही.

